तात्काळ/कालमर्यादा/महत्त्वाचे

क्रमांक -पोमसं/३१/३९-३/मोवाअ-संगणक अग्रीम (२०२३-२४)/९७/२०२३ मुंबई, दि.२१/०३/२०२४

विषय :- लेखा अनुदान २०२३ - २४
मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- "७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०२, मोटार वाहन अग्रिमाबाबत.

*********

## आदेश

शासन निर्णय ,गृह विभाग क्र.बीयुडी- ०४२३/प्र.क्र.१२२/आस्था-१, दि.१४/०२/२०२४ अन्वये सन २०२३-२४ या वित्तिय वर्षासाठी मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२- मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) योजनेअतंर्गत रु.१,००,००,०००/- (अक्षरी एक कोटी फक्त) एवढा निधी तसेच शासन निर्णय ,गृह विभाग क्र.बीयुडी- ०४२३/प्र.क्र.१२२/आस्था-१, दि.१३/०३/२०२४ अन्वये रु.०६,००,०००/- (अक्षरी सहा लाख फक्त) एवढा निधी असा एकूण रु.१,०६,००,०००/- (अक्षरी एक कोटी सहा लाख फक्त) एवढा निधी बी.डी.एस. प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच मागिल शिल्लक निधी रु.२०,०००/- (अक्षरी वीस हजार फक्त) असा एकूण रु.१,०६,२०,०००/- (अक्षरी एक कोटी सहा लाख वीस हजार फक्त) इतका निधी वाटपाकरीता उपलब्ध आहे. या कार्यालयाच्या अधिपत्याखालील घटक कार्यालयातील संबंधित विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांचे आस्थापनेवरील संबंधित ७६ अधिकारी/कर्मचाऱ्यांना मोटार वाहन अग्रिम वाटप करण्याकरिता एकूण रु.१,०६,१२,२४४/- (अक्षरी एक कोटी सहा लाख बारा हजार दोनशे चव्वेचाळीस फक्त) इतका निधी बी.डी.एस. प्रणालीवर सोबतच्या विवरणपत्रा प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रमाणे उपलब्ध असलेल्या रु.१,०६,२०,०००/- (अक्षरी एक कोटी सहा लाख वीस हजार फक्त) एवढ्या निधीपैकी रु.१,०६,१२,२४४/- (अक्षरी एक कोटी सहा लाख बारा हजार दोनशे चव्वेचाळीस फक्त) इतक्या निधीचे सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना, मोटार सायकल/स्कूटर/मोपेड/सायकल व दिव्यांग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२ विनियम दि.०९/११/२०२३ मधील विहीत तरतूदी नुसार अग्रिम वाटप करावे.

३. तसेच नवीन किंवा जुनी मोटार कार खरेदीसाठी राजपत्रित राज्य शासकीय अधिका-यांना मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम-१३६ आणि वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १२ नियम १३६ मधील अटी तसेच शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३२/२०२२ विनियम दि.१७/१०/२०२३ मधील नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून मोटार कार अग्रिम वाटप करावे.

४. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र.३ मध्ये नमुद विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, दिनांक १७/०४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १२ नियम १३६ मधील अटी तसेच शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२ विनियम दि.०९/११/२०२३ आणि शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३२/२०२२ विनियम दि.१७/१०/२०२३ मधील नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून मोटार वाहन अग्रिम मंजूरीचे आदेश निर्गमित करावेत.

५. **विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२ विनियम दि.०९/११/२०२३ आणि शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/ प्र.क्र.३२/२०२२ विनियम दि.१७/१०/२०२३ मधील नमूद विहित केलेल्या अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच मोटार वाहन अग्रिमाचे मंजुरी आदेश निर्गमित करताना त्यामध्ये सदर शासन निर्णयातील अटी शर्तींचा स्पष्ट उल्लेख करावा :-**

६. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४ (बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम- १०९५/ प्र.क्र.७०/ ९५/ विनियम, दि. २६/०९/१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

७. शासनाने, सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा विनियोग दि. ३१/०३/२०२४ पर्यंत होणे आवश्यक आहे. सर्व घटक प्रमुखांना निर्देशित करण्यात येते की, देयके दि.३१/०३/२०२४ पूर्वी कोषागारात सादर करुन ती पारीत करुन घ्यावीत. तसेच अग्रिमाची रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून अग्रिमाच्या वसूलीस सुरुवात करावी.

८. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा तो व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मोटार वाहन अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. आहरण व संवितरण

अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके कोणत्याही परिस्थितीत दि.३१/०३/२०२४ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सवत सूचना द्याव्यात. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना **दि.३१/०५/२०२४** पूर्वी न चुकता तसा अहवाल सादर करावा.

९. असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/ महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी व त्यानुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळयाची प्रमाणित माहिती दि.३१/०५/२०२४ पूर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

१०. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, खर्चमेळ्याची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

११. सदरचा खर्च सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०-शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२ - मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ. आरती सिंह )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक कार्यालय, म. राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, अमरावती शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर /पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण
पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रा. /नांदेड/ बुलडाणा / सोलापूर ग्रा./ भंडारा /गोंदिया /जालना/ वर्धा /नंदुरबार / औरंगाबाद ग्रा. / लोहमार्ग, औरंगाबाद/ जळगांव /
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ८ मुंबई /१० सोलापूर
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना

प्रत:-

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रत सविनय सादर -

महालेखापाल - १ मुंबई / महालेखाकार - २, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

| पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई "७६१०-शासकीय कर्मचारी इ. ना कर्जे " वित्तीय वर्ष २०२३-२४ मागणी क्र.वी-११ गौणशिर्ष २०२- मोटार वाहन अग्रिम | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव | विभाग प्रमुख | अर्जांची संख्या | मागणी केलेले अनुदान |
| १ | अपर पो.आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर | अपर पो.आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर | ७ | ४९०००० |
| २ | पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रा. | पोलीस अधीक्षक, नागपूर | २ | १४०००० |
| ३ | पोलीस अधीक्षक, नांदेड | पोलीस अधीक्षक, नांदेड | ४ | २८०००० |
| ४ | पोलीस अधीक्षक, बुलडाणा | पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ४ | २८०००० |
| ५ | पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण, अमरावती परिक्षेत्र अमरावती | विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती | १ | १४५००० |
| ६ | पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रा. | पोलीस अधीक्षक, सोलापूर | ४ | २८०००० |
| ७ | पोलीस अधीक्षक, भंडारा | पोलीस अधीक्षक, भंडारा | २ | १२७०००० |
| ८ | समादेशक, रारापोबल गट क्र.८ मुंबई | समादेशक, रारापोबल गट क्र.८ मुंबई | २ | २२४११९ |
| ९ | पोलीस अधीक्षक, गोंदिया | पोलीस अधीक्षक, गोंदिया | १ | १५००००० |
| १० | समादेशक, रारापोबल गट क्र.१० सोलापूर | समादेशक, रारापोबल गट क्र.१० सोलापूर | २१ | २९५६१५६ |
| ११ | पोलीस अधीक्षक, जालना | पोलीस अधीक्षक, जालना | १ | ७०००० |
| १२ | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना | १ | १४०६१० |
| १३ | पोलीस अधीक्षक, वर्धा | पोलीस अधीक्षक, वर्धा | १० | ७००००० |
| १४ | अपर पो.आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण | अपर पो.आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण | १ | ७०००० |
| १५ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | ६ | ९९०००० |
| १६ | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रा. | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रा. | १ | १६५००० |
| १७ | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद | ७ | ४५९४२३ |
| १८ | पोलीस अधीक्षक, जळगांव | पोलीस अधीक्षक, जळगांव | ३ | २१०००० |
| १९ | पोलीस आयुक्त, अमरावती | पोलीस आयुक्त, अमरावती | २ | २४१९३६ |
| | | एकूण | ८० | १,०६,१२,२४४/- |